पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
e-mail :sp.washim@mahapolice.gov.in Website:www.washimpolice.gov.in

दिनांक :— १२/११/२०२४

# प्रेस नोट

## विधानसभा निवडणुक — २०२४

विधानसभा निवडणुक — २०२४ निर्भीड व निष्पक्षपाती वातावरणात पार पडाव्यात, समाजात शांतता व सुव्यवस्था राहावी, सर्वसामान्य जनतेची सुरक्षा अबाधीत रहावी, याकरीता वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे दक्ष राहुन सातत्याने प्रभावी कायदेशीर कारवाया प्रतिबंधक उपाययोजना केल्या जातात. त्यासाठी वेळोवेळी ऑपरेशन ऑल आउट, कोंबीग ऑपरेशन व नाकाबंदी सारख्या विशेष माहिमा राबवुन कायद्याचे उल्लंघन करणा—यांविरुध्द कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जातो. निगराणी बदमाश, रेकॉर्डवरील गुन्हेगार, वारंटचे आरोपी तसेच नाकाबंदी करुन संशयीत वाहनांची सुरक्षेच्या दृष्टीने तपासणी केली जाते. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करुन समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्तापीत राहील याची दक्षता घेतली जात आहे.

विधानसभा निवडणुक — २०२४ संबंधाने दिनांक १५.१०.२०२४ पासुन आदर्श आचारसंहीता लागु झाली आहे. विधानसभा निवडणुकांचे पार्श्वभुमीवर आजपर्यंत अवैध शस्त्र व दारुगोळा संबंधाने एकुण १० केसेस, अवैध देशी, विदेशी, हातभट्टी दारु संबंधाने **३१९ केसेस करण्यात आल्या आहेत त्यामध्ये एकुण २९,२४,६९०/— रुपयांचा मुद्देमाल** ज्यामध्ये देशी विदेशी दारुचा ३,८६,८६५/— रुपयांचा मुद्देमाल व हातभट्टी दारु, मोह सडवा असा २९,२४,६९०/— रुपयांचा मुद्देमाल आहे.

गुन्हेगारांवर वचक राहण्याकरीता जिल्हयातील गुन्हेगारांवर प्रभावी प्रतिबंधक कारवाया करण्यात येत आहे त्याअंतर्गत कलम १२६ बिएनएसएस प्रमाणे ६५१, कलम १२९ बिएनएसएस प्रमाणे ५४ व कलम ९३ बी मदाका प्रमाणे ८२ कारवाया तसेच ५५,५६,५७ म.पो.का करण्यात आल्या आहे. MPDA कायद्या अंतर्गत आजपावेतो १० ईसमांना वाशिम जिल्हा कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे. ही कारवाई जिल्हयाच्या ईतिहासातील सर्वात मोठी प्रभावी कार्यवाही आहे. विधानसभा आचारसंहीता लागु झाल्यापासुन ०२ ईसमांना वाशिम जिल्हा कारागृहात स्थानबंध्द करण्यात आले आहे. अशा मोठया प्रमाणात प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाया करुन विधानसभा निवडणुक संबंधाने शांतता प्रस्तापीत राहील याची खबरदारी घेण्यात येत आहे.

निवडणुक संबंधाने सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी व ठाणेदारांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. आचारसंहीतेचे कोणीही उल्लंघन केल्यास त्यांचेविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल. विधानसभा निवडणुक — २०२४ संबंधीत आदर्श आचारसंहीताचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन पोलीस विभाग व प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.